# जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर

## (आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन शाखा)

scy.ahmednagar@gmail.com (टोल फ्री क्रं.1077) दुरध्वनी क्र. 0241-2343600

---

**विषय** - अहमदनगर जिल्हयातील मंगल कार्यालय/मॅरेज हॉल, लॉन्स व इतर लग्न समारंभाचे ठिकाणी निर्देशांचे उल्लंघन करण्या-या व्यक्तींवर कारवाई करणेबाबत...

**वाचावे** -
1. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005
2. साथ रोग अधिनियम, 1897
3. महाराष्ट्र पोलीस अधिनियम - कलम 43
4. या कार्यालयाकडील पत्र क्र. आव्यमपु/कार्या 19अ/592/2020, दि.02/06/2020.
5. महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र. डीएमयु/2020/सी.आर.92-डीआयएसएम - 1, दि. 29/01/2021.
6. जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर यांचेकडील आदेश क्र. डी.सी./कार्या 9 ब 1/235/2021, दि.29/01/2021.

| आव्यमपु/कार्या 19अ/ 199 /2021 | **आदेश** | अहमदनगर दिनांक 22/02/2021 |
|---|---|---|

ज्याअर्थी, साथरोग अधिनियम 1897 कलम 2 (1) नुसार जिल्हाधिकारी अहमदनगर यांना अहमदनगर जिल्हा कार्यक्षेत्रात कोवीड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत करण्यात आलेले आहे. तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम 43(1) अन्वये जिल्हादंडाधिकारी यांना जिल्हयातील कोणत्याही ठिकाणी यात्रेमुळे, जत्रेमुळे किंवा तशा दुस-या प्रसंगामुळे मोठा जनसमुदाय जमण्याचा संभव असून त्याठिकाणी साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव किंवा फैलाव होऊ नये म्हणून त्यास आवश्यक वाटतील अशा विशेष उपाययोजना करता येतील.

ज्याअर्थी, मंगल कार्यालय/मॅरेज हॉल व लॉन्स या ठिकाणी लग्न समारंभामुळे मोठा जनसमुदाय एका ठिकाणी जमा होण्याची शक्यता असल्याने कोव्हीड 19 विषाणूचा प्रादुर्भाव रोखणे तसेच आगामी कालावधीतील संभाव्य कोविड 19-विषाणू संसर्गाची दुसरी लाट विचारात घेता त्यासाठी अहमदनगर जिल्हयातील मंगल कार्यालय/मॅरेज हॉल लॉन्स व इतर लग्न समारंभाचे ठिकाणी आयोजित केल्या जाणा-या लग्न समारंभाच्या अनुषंगाने कोविड प्रतिबंधात्मक विशेष उपाययोजना करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी, संदर्भ क्र. 5 अन्वये लग्न समारंभासाठी 50 व्यक्तींनाच उपस्थित राहणेसाठी शासनाने परवानगी देण्यात आलेली आहे. तसेच संदर्भ क्र. 6 अन्वये अहमदनगर जिल्हयात लग्न समारंभासाठी 50 व्यक्तींनाच परवानगी देण्यात आलेली आहे. तसेच संदर्भ क्र. 4 अन्वये अहमदनगर जिल्हयामध्ये मंगल कार्यालयामध्ये लग्न समारंभाचे आयोजन करणेबाबत करावयाच्या कोव्हीड प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत निर्देश जारी करण्यात आलेले आहेत. अहमदनगर जिल्हयातील मंगल कार्यालय/मॅरेज हॉल, लॉन्स व इतर लग्न समारंभाचे ठिकाणी लग्न समारंभासाठी आलेले व-हाडी, पाहुणेमंडळी, मंगल कार्यालयातील कर्मचारी व इतर उपस्थित सर्व व्यक्ती मिळून जास्तीत जास्त 50 व्यक्तींनाच लग्न समारंभास उपस्थित राहणेस परवानगी असताना देखील मोठया प्रमाणात नागरीक उपस्थित राहत असलेबाबतची बाब निदर्शास आलेली आहे. कोरोना विषाणूच्या वाढत्या प्रादुर्भावाच्या अनुषंगाने लग्न समारंभाच्या ठिकाणी नागरीकांच्या होणा-या गर्दीचे अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम 43 (1) मधील तरतूदीनुसार विशेष उपाययोजनांतर्गत, अहमदनगर जिल्हयातील लग्न समारंभ असलेल्या मंगल कार्यालय/मॅरेज हॉल लॉन्स व इतर लग्न समारंभाचे ठिकाणी 50 व्यक्तीपेक्षा जास्त व्यक्ती उपस्थित न राहणेबाबत तसेच मंगल कार्यालय/मॅरेज हॉल लॉन्स व इतर लग्न समारंभाचे ठिकाणी कोविड-19 चा प्रादुर्भाव रोखणेकामी सोशल डिस्टन्सिंग, गर्दीचे व्यवस्थापन,

Scanned with CamScanner

सदर ठिकाणाचे निर्जंतुकीकरण तसेच व-हाडी, पाहुणेमंडळी, मंगल कार्यालयातील कर्मचारी व इतर उपस्थित सर्व व्यक्तीसाठी सॅनिटायझरची उपलब्धता, थर्मल स्कॅनिंग व पल्स ऑक्सीमीटर द्वारे तपासणी व्यवस्था इ. आवश्यक त्या सर्व उपाययोजना करणेबाबत या जाहीर नोटीसव्दारे निर्देश करून फर्मावित आहे.

अहमदनगर जिल्हयातील लग्न समारंभ असलेल्या मंगल कार्यालय/मॅरेज हॉल, लॉन्स व इतर लग्न समारंभाचे ठिकाणी 50 व्यक्तीपेक्षा जास्त व्यक्ती उपस्थित राहणे तसेच कोविड-19 चा प्रादुर्भाव रोखणेकामी सोशल डिस्टन्सिंग, गर्दीचे व्यवस्थापन, सदर ठिकाणाचे निर्जंतुकीकरण तसेच व-हाडी, पाहुणेमंडळी, मंगल कार्यालयातील कर्मचारी व इतर उपस्थित सर्व व्यक्तीसाठी सॅनिटायझरची उपलब्धता, थर्मल स्कॅनिंग व पल्स ऑक्सीमीटर द्वारे तपासणी व्यवस्था इ. आवश्यक त्या सर्व उपाययोजना करणे याचे उल्लंघन करणा-या संबंधीत मंगल कार्यालय/मॅरेज हॉल, लॉन्स व इतर लग्न समारंभाचे ठिकाणचे व्यवस्थापन यांचे विरुध्द रक्कम रु. 10000/- इतकी भरपाई रक्कम व फी आकारणे व वसुल करणेकामी अहमदनगर जिल्हयातील पोलीस आस्थापनेवरील पोलीस नाईक ते पोलीस निरीक्षक या दर्जाचे पोलीस अंमलदार यांना या आदेशाव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

पोलीस प्रशासनाने अहमदनगर जिल्हयातील मंगल कार्यालय/मॅरेज हॉल, लॉन्स व इतर लग्न समारंभाचे ठिकाणी 50 व्यक्तीपेक्षा जास्त व्यक्ती तपासणीत आढळून आल्यास संबंधीत मंगल कार्यालय/मॅरेज हॉल लॉन्स व इतर लग्न समारंभाचे ठिकाण यांचे व्यवस्थापनाविरुध्द उपरोक्त प्रमाणे कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीचा साप्ताहिक अहवाल जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालयास सादर करावा.

स्वाक्षरी /--

**(डॉ. राजेन्द्र ब. भोसले)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**अहमदनगर**

**प्रति,**

1. जिल्हा पोलीस अधीक्षक, अहमदनगर
2. मंगल कार्यालय/मॅरेज हॉल, लॉन्स व इतर लग्न समारंभाचे व्यवस्थापन, अहमदनगर जिल्हा

प्रत - मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेकडेस माहितीसाठी.
प्रत - मुख्य कार्यकारी अधिकारी, छावणी मंडळ, अहमदनगर यांचेकडेस माहितीसाठी
प्रत - आयुक्त, महानगरपालीका, अहमदनगर यांचेकडेस माहितीसाठी
प्रत - जिल्हा माहिती अधिकारी, अहमदनगर यांचेकडेस माहिती व प्रसिध्दीसाठी.
प्रत - उपविभागीय अधिकारी (सर्व), जि. अहमदनगर यांचेकडेस माहितीसाठी
प्रत - तहसिलदार तथा घटना व्यवस्थापक (सर्व), जि. अहमदनगर यांचेकडेस माहितीसाठी
प्रत - गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व) यांचेकडेस माहितीसाठी
प्रत - मुख्याधिकारी नगरपालिका/नगरपंचायत (सर्व), जि. अहमदनगर यांचेकडेस माहितीसाठी

**(संदीप निचित)**
**निवासी उपजिल्हाधिकारी तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण**
**अहमदनगर**

Scanned with CamScanner